# पंचायत राज व्यवस्था आणि महिलांचा सहभाग

**प्राध्यापक डॉ. प्रशांत कृष्णराव पाठक**
**निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालय, भद्रावती**
**ता. भद्रावती जि. चंद्रपूर**

**प्रा. रेखा मनोहर बडोदेकर**
**लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी**

**सारांश**

भारत हा प्रामुख्याने खेडयांचा देश आहे. आजही जवळजवळ ७० % जनता ही खेडयांमध्ये राहत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शांसनसंस्थांना जास्त महत्व आलेले दिसते. या स्थानिक स्वराज्य संस्थांचा उल्लेख पंचायत राज्य व्यवस्था असा केला जातो. ग्रामीण जनतेचा विकास आणि त्यांचा स्थानिक प्रशासनाला प्रत्यक्ष सहभाग असावा या दृष्टीने या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थापना केलेली दिसते.पंचायत ही भारतातील राजकीय संस्थांमधील सर्वात जुनी आणि पायाभूत राजकीय संस्था मानली जाते. स्थानिक शासनसंस्था आणि लोकशाही शासनपध्दती यांचे संबंघ अत्यंत घनिष्ठ आहे; "कारण लोंकांची लोंकाव्दारे आणि लोंकांसाठी कार्यरत असणारी शासनपध्दती असे लोकशाहीचे वर्णन करण्यात येते". स्वातंत्र्योत्तर काळात राजकीय व सामाजिक बदलांमुळे देशाच्या प्रशासकीय व्यवस्थेवर प्रभाव पडला. लोकशाही समाज कल्याणाचा स्वीकार राज्याने केल्याने कल्याणकारी प्रशासनाची व जनतेबाबत जबाबदारीच्या प्रशासनाची संकल्पना निर्माण झाली. त्यामुळे प्रशासनाच्या संरचनेत व कार्यात लक्षणीय बदल झाले. सामाजिक परिवर्तनाचे मुख्य साधन म्हणून आणि लोंकांच्या गरजांना व आकांक्षांना प्रतिसाद देणारे जबाबदार प्रशासन म्हणून स्थानिक प्रशासन संस्थांनी कार्य करावे अशी अपेक्षा निर्माण झाली. सरकारने समाज कल्याणकारी राज्याच्या धैर्याचा स्वीकार केला व म्हणून राज्याने राष्ट्र उभारणीचा महत्वकांक्षी कार्यक्रम हाती घेतला. यासाठी विकासात्माक कार्यक्रमाचा तळागाळापर्यंत प्रसार होणे आवश्यक असते. स्थानिक स्वराज्य संस्था याबाबतीत महत्वाची भूमिका बजावीत असतात.

**प्रास्ताविक –**

भारत हा प्रामुख्याने खेडयांचा देश आहे. आजही जवळजवळ ७० % जनता ही खेडयांमध्ये राहत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शांसनसंस्थांना जास्त महत्व आलेले दिसते. या स्थानिक स्वराज्य संस्थांचा उल्लेख पंचायत राज्य व्यवस्था असा केला जातो. ग्रामीण जनतेचा विकास आणि त्यांचा स्थानिक प्रशासनाला प्रत्यक्ष सहभाग असावा या दृष्टीने या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थापना केलेली दिसते.पंचायत ही भारतातील राजकीय संस्थांमधील सर्वात जुनी आणि पायाभूत राजकीय संस्था मानली जाते. स्थानिक शासनसंस्था आणि लोकशाही शासनपध्दती यांचे संबंघ अत्यंत घनिष्ठ आहे; "कारण लोंकांची लोंकाव्दारे आणि लोंकांसाठी कार्यरत असणारी शासनपध्दती असे लोकशाहीचे वर्णन करण्यात येते". स्वातंत्र्योत्तर काळात राजकीय व सामाजिक बदलांमुळे देशाच्या प्रशासकीय व्यवस्थेवर प्रभाव पडला. लोकशाही समाज कल्याणाचा स्वीकार राज्याने केल्याने कल्याणकारी प्रशासनाची व जनतेबाबत जबाबदारीच्या प्रशासनाची संकल्पना निर्माण झाली. त्यामुळे प्रशासनाच्या संरचनेत व कार्यात लक्षणीय बदल झाले. सामाजिक परिवर्तनाचे मुख्य साधन म्हणून आणि लोंकांच्या गरजांना व आकांक्षांना प्रतिसाद देणारे जबाबदार प्रशासन म्हणून स्थानिक प्रशासन संस्थांनी कार्य करावे अशी अपेक्षा निर्माण झाली. सरकारने समाज कल्याणकारी राज्याच्या धैर्याचा स्वीकार केला व म्हणून राज्याने राष्ट्र उभारणीचा महत्वकांक्षी कार्यक्रम हाती घेतला. यासाठी विकासात्माक कार्यक्रमाचा तळागाळापर्यंत प्रसार होणे आवश्यक असते. स्थानिक स्वराज्य संस्था याबाबतीत महत्वाची भूमिका बजावीत असतात.

"विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात म्हणजे गाव किंवा शहरात तेथील जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींव्दारा तेथील

शासन आणि प्रशासन कार्यान्वीत करणे यास स्थानिक शासन असे म्हणतात". स्थानिक पातळीवरील सार्वजनिक व्यवहांराची जबाबदारी स्थानिक जनतेला सहभागी करून घेणे हा स्थानिक शासनसंस्था स्थापन करण्यामागचा मुख्य उददेश असतो. भारतीय संघराज्य व्यवस्थेत स्थानिक शासनसंस्था हा विषय राज्यसुचित समाविष्ट करण्यात आला असल्याने आपल्या विशिष्ट गरजांनुसार स्थानिक शासनसंस्थांना स्थापन करण्याचा अधिकार राज्याच्या विधिमंडळांना असतो.विधिमंडळाने प्रेरित केलेल्या कायद्यानुसार स्थापन केलेल्या संस्थांमार्फत स्थानिक शासनसंस्थांचे कार्य चालते. लोंकाची इच्छा हा शासनस्थेंच्या सत्तेचा मुलाधार आहे. लोकशाहीया या तत्वावर स्थानिक शासनसंस्थेंची संकल्पना आधारलेली आहे. जनतेच्या गरजा आणि समस्या स्थानपरत्वे भिन्न भिन्न असतात. परंतु स्थानिक स्वराजसंस्था नागरिंकाच्या अधिक निकटवर्ती असते. त्यामुळे नागरिकांना त्यांच्या संबंधीच्या निर्णयांमध्ये सहभागी करून घेणे हे स्थानिक शासनसंस्थेंला उत्तम प्रकारे शक्य होते. तसेच तिला विकासकार्यात गती देण्यासाठी त्यांच्या ज्ञानाचा आणि शक्तीचा उपयोग करून घेता येतो.अर्थात स्थानिक लोंकांच्या समस्याचे निराकरण करण्यासाठी आणि कार्याक्षम अशा प्रशासनासाठी स्थानिक शासनसंस्थेंची आवश्यकता असते.

**स्थानिक शासनाचे महत्व :** ऐतिहासिक तात्विक प्रशासकीय आणि व्यावहारिकदृष्टया स्थानिक शासनाचे महत्व अन्यनसाधारण आहे. ऐतिहासिकदृष्टया विचार केला तर राष्ट्रीय अथवा प्रांतिक शासनापेक्षा स्थानिक शासनसंस्था प्राचीन आहे. स्थानिक लोंकांच्या गरजा भागविण्यासाठी त्यांचा उदय प्रथम झालेला दिसून येतो. प्रादेशिक राज्ये निर्माण झाल्यावर देखिल स्थानिक शासनाचे अस्तित्व महत्वाचे ठरलेलें दिसून येते. एवढेच नाहीतर आजही राष्ट्रीय शासनापेक्षा जनतेचा प्रत्यक्ष संबंध स्थानिक शासनाशीच येतो. जनतेच्या स्थानिक स्वरूपाच्या गरजा भागविण्यासाठी स्थानिक शासनच जास्त आवश्यक असल्याने त्याचे महत्व टिकून राहीले. किंबहूना कल्याणकारी राज्य आणि नियोजनबध्द आर्थिक विकास या संकल्पनाच्या स्वीकारामुळे त्यांचे महत्व आवश्यकता व कार्यक्षेत्र सातत्याने विस्तृत होत आहे• पंडित नेहरू यांनी संसदेत या संदर्भात असे उदगार काढले होते की, " जनतेमध्ये नवे विचार, नव्या पध्दती रूजुन आपल्या भोवतालचे जग आकलन होण्यासाठी तसेच स्वावलंबनाचे तत्व विकसित करण्यासाठी स्थानिक शासनाचे महत्व अनन्यसाधारण आहे.''१ श्रीवास्तव यांनी आपल्या *म्युनसिपल गव्र्हमेंट ॲन्ड ॲडमिनिस्ट्रेशन इन इंडिया* या ग्रंथांत म्हटले आहे की, "स्थानिक शासन समाजाला केवळ कल्याणकारी सेवा पुरविते म्हणून महत्वाचे आहे असे नाही, तर ते नागरिकांना स्थानिक विभागाच्या शासनात विचारपूर्ण आणि कृतीशील सहभाग प्राप्त करून देते की, ज्यामुळे त्यांच्यात सृजनशील कार्य करण्याची आवड,उत्सुकता आणि स्थानिक राष्ट्रीयत्व विकसित होते म्हणूनही ते महत्वाचे आहे ''•२

**पंचायत राज्य व्यवस्था :** भारतीय संविधानात गांधीवादी तत्वातील आदर्श ग्रामस्वराज्याचे तत्व ४० व्या कलमानुसार राज्याच्या नितिनिदेर्शक तत्वात समाविष्ट करण्यात आले आहे • खेडयापाडयातील लोंकापर्यंत लोकशाही पोहोचविण्याचा आणि खेडयातील लोंकानाही स्थानिक संस्थांच्या कार्यात सहभागी करून घेण्याचा मार्ग म्हणजे लोकशाही विकेंद्रीकरण होय• १९५७ साली कै• बळंवंत मेहता यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने सामुहिक विकास योंजनांच्या कार्यवाहीचा अहवाल विकेंद्रीत लोकशाही किंवा पंचायत राज्याच्या माध्यमातून सादर केला होता• या समितीने केलेल्या शिफारशी राष्ट्रीय विकास मंडळ व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या केंद्रीय समितीने स्वीकृत केल्यात.

**महाराष्ट्रातील पंचायत राज्यपध्दती :** आपण स्वीकारलेल्या पंचायती राज्याच्या पध्दतीत महाराष्ट्रातील संरचना अधिक स्वागतार्ह आहे. कारण तिथे जिल्हा परिषद ही मुख्य यंत्रणा आहे . महाराष्ट्र सरकारच्या पंचायत राज्याच्या कार्याचे मूल्यमापन करण्याच्या हेतूने महाराष्ट्र सरकारने (रिपोर्ट ऑफ

इव्हॅलुएशन कमिटी ऑन पंचायती राज मध्यवर्ती शासकीय मुद्रणालय , महाराष्ट्र १९७१) नेमलेल्या समितीचा अहवाल वाचनीय आहे या अहवालात असे म्हटले आहे की – “ महाराष्ट्र ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात नेतृत्व तरूणांच्या हाती आहे असे आढळून येते• कारण ग्रामीण भागातील २६ ते ४५ वर्षे वयोबटातील पदाधिकां-यांचे प्रमाण ७० टक्के आहे तर ४५ वर्षावरील गटातील पदाधिकारी २९ टक्के आहेत• ”३ याचबरोबर शेतकरी वर्गाकडे नेतृत्वाची सूत्रे येत आहेत हे सुध्दा स्पष्ट झाले आहे • ९३ टक्के पदाधिकारी शेतकरी वर्गातील आहेत. तरूण नेतृत्व आहे म्हणुन ते धडाधडीचे आहे असे मात्र म्हणता येत नाही. ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यासाठी क्रियाशिल, कल्पक आणि धडाडीच्या नेतृत्वाची गरज आहे पण याबाबत ग्रामीण नेतृत्व कमी पडले आहे. विकास कार्यासाठी जनतेचे सहकार्य मिळवून कर रूपाने त्यांच्याकडून पैसा गोळा करणे अटळ असते. पण या गोष्टी समजावून देवून जनतेचे सहकार्य मिळविणे या भागातील नेतृत्वाला तितकेच जमलेले दिसत नाही . कर रूपाने जमा होणा-या पैशाची वसुली करण्यातही दिरंगाई दिसते. खूप वेळा आपल्या अधिकाराचे प्रदर्शन करण्याच्या मोहाने पदाधिकारी केवळ दडपण आणण्याचा मात्र प्रयत्न करतात. जनजागृतीच्या कायपिक्षा निवडणुकांवर यांचे लक्ष केंद्रीत झालेले असते. करांची भाषा करून अथवा समाजकल्याणच्या हितार्थ सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या हेतुने काही कार्यक्रम हाती घेणे (उदा. हरिजनांसाठी विहिरीचा वापर खुला करणे) व वाद निर्माण करणे याऐवजी विशेष काहीच न करणे हा मार्ग ग्रामीण नेतृत्वाने पत्करलेला दिसतो.

वास्तविक ग्रामीण भागात असो वा शहरी भागात असो, स्थानिक संस्थांच्या कारभारात राष्ट्रीय पंक्षाचे गटबाजीचे राजकारण असणे योग्य नव्हे, लोकशाही विकेंद्रीकरण व्यवस्था भारतात रूजली असली तरी हा प्रयोग पूर्णपणे कोणत्याही राज्यात यशस्वी झाला असे म्हणता येणार नाही .खेडयापाडयातील सर्वसामान्य जनता ज्या प्रमाणात स्थानिक कारभारात सहभागी व्हावयास हवी त्या प्रमाणात जनतेचे उत्स्फूर्त सहकार्य मिळण्यात यश आलेले नाही. पंचायत राज्यामुळे जिल्हा पातळीवरील कलेक्टरचे महत्व कमी झाले हे मान्य केले तरी नोकरशाहीच्या जागी नवे जोमदार नेतृत्व निर्माण झालेले आढळत नाही. पंचायत राज्य प्रक्रियेव्दारा वास्तवात शेतकरी वर्गाच्या हातीच सत्ता प्रदान केली आहे. जातीवादाने खेडे गावच्या राजकारणात मूळ धरले आहे. पंचायतराज्याच्या कामकाजाच्या दृष्टीने पंचायती राज्यांना आर्थिक स्वांतत्र्याच्या बाबतीत जे मर्यादित स्वांतत्र्य असलेले निदर्शनास आले त्याचबरोबर जातीयवाद नष्ट करणे आणि साक्षरता प्रसार करण्याच्या दृष्टीने जे प्रयत्न व्हायला हवे होते ते नेतृत्वाअभावी होऊ शकले नाही. याचे कारण काय? हे ध्यानात घेऊन त्यादृष्टीने शासनाने प्रयत्न करण्याचे ठरविले आणि या पंचायत राज्य प्रक्रियेला नवीन दिशा मिळाली.

**७३ वी घटनादुरूस्ती आणि महाराष्ट्र राज्य:** १ में १९६२ रोजी महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा पास झाल्यापासून महाराष्ट्र पंचायत राज्याचे युग सुरू झाले. लोकशाही विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेत महाराष्ट्र राज्य सुरूवातीपासूनच आघाडीवर होते. चार दशकांचा प्रवास येथील पंचायत राज्य व्यवस्थेने पूर्ण केला.१९७१ साल नंतरची दहा -बारा वर्षे फारच ढिलाईची गेली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका त्याकाळात न झाल्यामुळे प्रशासनात नोकरशाहीचे पारडे जड झाले होते. पण ७३ वी घटना दुरूस्ती अमंलात येण्यापुर्वीच महाराष्ट्रातील ही स्थिती पलटू लागली होती. महाराष्ट्र सरकारने स्त्रिया, अनुसूचित जाती व जनजाती तसेच इतर मागासजातींना स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये आरक्षण देऊन ग्रामीण स्तरावर सामाजिक बदलाची प्रक्रिया महाराष्ट्राने याआधीच गतिमान केली होती. ७३ व्या घटना दुरूस्तीने तिला आणखी चालना मिळाली. विशेषत: लोकशाही आघाडी सरकारने काही स्वागतार्ह ठोस पावले उचल्यामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य

चळवळीची ढिलाई एकदम दूर झाली आहे. त्यामुळे पहिल्या महाराष्ट्र वित आयोगाने केलेल्या पण, सरकार दप्तरी दुर्लक्षित ठरलेल्या शिफारशी आता अमंलात येण्याची शक्यता वाटू लागली आहे. महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या काही स्तुत्य निर्णयांमुळे ग्रामीणांचे अधिकार व कार्यक्षेत्र वाढले आहे. उदा.ग्रामसभा वर्षातुन चार (४) वेळा भरल्या पाहिजेत, ग्रामीण जनतेच्या दैंनंदिन जगण्याशी संबंधित कामाचे अग्रक्रम ग्रामसभेने ठरवून द्यावेत. कोणत्या कामासाठी किती आर्थिक तरतूद आहे. याची माहिती सर्व खातेदारांना आणि सर्व मतरांना ग्रामसभेपूर्वी पोहचली पाहिजे अशा आशयाचे आदेशही देण्यात आले आहेत. नागरिकांना माहितीचा अधिकार या राज्याने दिलेलाच आहे. म्हणजेच असे म्हणता येईल की, स्थानिक स्वराज्य संस्थातील निरक्षर व गोरगरीब नागरिकांना हा हक्क पोचवण्याचा प्रयत्न राज्य सरकारने या आदेशांच्या स्वरूपात केला आहे. सत्तेचा वापर कोण कशासाठी व कसा करतो, विकास कार्यक्रमांमध्ये अडथळे कोण आणतात? हे ग्रामीण जनतेला समजू लागले आहे.

अकराव्या परिशिष्टात नमूद केलेल्या अधिकार विषयांपैकी आरोग्य,शिक्षण,समाजकल्याण,रस्ते व बांधकाम या क्षेत्रातील ९ विषयांच्या १२२ जिल्हास्तरीय योजना महाराष्ट्र सरकारने जिल्हा परिषदेकडे वर्ग केल्या असून राज्याच्या एकूण अर्थसंकल्पापैकी २० टक्के निधीवर जिल्हा परिषंदाचे नियंत्रण यापुढे असणार आहे. याचे निश्चितच दूरगामी परिणाम राज्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांना होतील.

**पंचायत राज्य व्यवस्थेत महिलांचा सहभाग :** भारत स्वंतत्र झाल्यांनंतर भारतीय नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी व लोकतंत्रात्मक एकात्म शासन व्यवस्थेला मजबूत करण्यासाठी तत्कालीन नेत्यांनी लिखीत संविधांनांची निर्मिती केली.त्यात त्यांनी समाजातील शोषित, पिडीत व उपेक्षित वर्गाच्या विकासाच्या दृष्टीकोनातून कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने संविधानाव्दारे तरतूदी करण्यावर भर दिला. प्राचीन काळापासून उपेक्षित,शोषित राहिलेल्या स्त्रियांच्या विकासासाठी पुरूषांबरोबर त्यांना अधिकार प्रदान होण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. भारतीय स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचे अधिकार संविधानाने प्रदान केले. संविधानात मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वे या माध्यमातून स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी संधी व दर्जा प्रदान करण्यात आला. घटक राज्य शासनांनी मार्गदर्शक तत्वांना समोर ठेवून महिलांच्या विकासासाठी कायदे करावे असे सूचविण्यात आले. याचे श्रेय स्वातंत्र्यपूर्ण काळात स्त्रियांच्या विकासासाठी तत्कालीन समाजसुधारक महात्मा फुले ,आगरकर,महर्षी कर्वे,शाहू महाराज आदी समाजसुधारकांना जाते.त्यांच्या प्रयत्नांमुळेच समाजाचा स्त्रियाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हळूहळू बदलू लागला. महात्मा गांधीनी या समाजसुधारकांच्या प्रयत्नांना अनुसरून भारतीय स्त्रियांच्या विकासाचा आग्रह धरला, गांधीच्या मते, “ *भारतीय स्त्रियांना विकासापासून वंचित ठेवणे म्हणजे देशाच्या विकासाची अर्धी शक्ती गमावणे होय. त्यासाठी स्त्री उन्नतीच्या दृष्टीकोनातून समाजाने पुढे आले पाहिजे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढला पाहिजे यादृष्टीने प्रयत्न व्हायला पाहिजे असे नमूद केले.”४*

**पंचायत राज्य किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण : सं**विधानानुसार आज भारतातील विविध घटक राज्य सरकारे व केंद्र सरकार यांनी भारतातील स्त्रियांना विशेष सवलती देण्यास सुरवात केली. संविधानाच्या कलम २४३ (घ)(३)व २४३(न)(३) नुसार प्रत्येक पंचायत तसेच नगरपालिकांमध्ये प्रत्यक्ष निर्वाचित सभासदांच्या एकूण संख्येमध्ये एक तृतिंयाश स्थान अनुसूचित जाती, जनजाती स्त्रियांसाठी आरक्षित आहे. याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सहभागी होण्यासाठी विशेष आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. अशारीतीने भारतीय संविधानात आर्थिक सामाजिक आणि राजकिय क्षेत्रात महिलांना पुरूषांच्या बरोबरीने अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. याचबरोबर हे देखिल मान्य करण्यात आले आहे की, जो वर्ग शतकापासून शोषित व

उपेक्षित होता,त्या समाजातील स्त्रियांच्या विकासावर विशेष लक्ष देणे राज्यांचे कर्तव्य आहे. संविधानाच्या कलमांचा विचार करून महिलांना पुरूषांच्या बरोबरीने अधिकार प्रदान करण्यात आणि महिलांना मताधिकार देण्यात भारताने जगात अग्रक्रम पटकाविला आहे.

**लोकशाही प्रक्रियेत महिलांचे योगदान :** भारतीय संधिनात लोकप्रतिनिधित्व कायदा आणि पंचायती कायदा नुसार १९५२ मधील प्रथम सार्वत्रिक निवडणुकीपासूनच महिला प्रत्यक्ष राजकीय प्रक्रियेत सहभागी होत आहेत. मात्र स्थानिक व सांसदीय निवडणुकीतील महिलांच्या सहभागाबाबत विचार केल्यास त्यांचे निवडणुकीतील योगदान काहीसे निराशाजनक राहिले असले तरी त्यांचा सहभाग मात्र हळूहळू वाढत होता. ज्या महिला संसदेवर निवडून आल्यात त्यामध्ये त्यांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव कमी राहून वडिल किंवा पती यांच्या मर्जीवर व त्यांच्या प्रभावाखाली त्या कार्य करीत असल्याचे आढळून आले. महिलांचा संसदेतील सक्रीय सहभाग लक्षात घेतांना काहि महिलांचा उल्लेख करणे अत्यांत महत्वाचे आहे. उदा. इंदिरा गांधी ,सुचेता कृपलानी ,विजयालक्ष्मी पंडीत,नंदिनी सत्पयी,तारकेश्वरी सिन्हा,मृणाल गोरे,प्रमिला दंडवते, जयललिता, मोहसिना कडवई ,राजेन्द्रकुमारी बाजपेयी, नजमा हेपतुल्ला,उमा भारती, ममता बॅनर्जी , सुषमा स्वराज , विजया राजे सिधींया, मार्गारिट अल्वा, मायावती , सोनिया गांधी, आदी महिलांनी आपल्या व्यक्तिमत्वाची छाप संसदेवर आणि विधी मंडळावर टाकलेली दिसते. इतर महिला प्रतिनिधी मात्र अभिलेखांपर्यंतच सीमीत राहिल्यात. उपरोक्त महिलांनी आपल्या व्यक्तिमत्वाची छाप पाडून आपले स्थान पक्के बनविले. निवडणूक सर्वेक्षणातून असे आढळून आले की, लोकतात्रिंक प्रक्रियेत पुरूषांच्या तुलनेत मताधिकाराचा वापर करण्यात स्त्रिंयाचे योगदान वाढत आहे. ग्रामीण भागातील महिला निरक्षर असूनही राजकीय मतदान प्रक्रीयेबाबत त्या जागृत आणि सतर्क आहेत. त्यामुळे शहरापेक्षा ग्रामीण भागातील स्त्रिंयाचे मतदानाचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले.

**पंचायत व स्थानिक संस्थांमध्ये महिलांकडे नवी दायित्व:** पंचायती व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना विशेष आरक्षण प्राप्त झाल्यामुळे त्यांची जबाबदारी वाढलेली आहे. देशातील एक तृतिंयाश ग्राम पंचायती ,क्षेत्रीय पंचायत जिल्हा परिषद, नगर परिषद , महानगर पालिका इत्यादी ठिकाणी शासनाची सूत्रे हाती घेता येईल आणि या नविन भूमिकेतून महिलांना देशाच्या विकास प्रक्रियेत अधिक सक्रीय होता येईल तसेच त्यांनी त्यांच्या नजरेतून आपले गाव जिल्हयांच्या विकासाच्या योजना राबविता येतील. स्थानिक स्वराज्य संस्थांचा विषय व महात्मा गांधीची ग्राम स्वराज्याची कल्पना याकडे शासनाने काही प्रमाणात दुर्लक्ष केल्यामुळे विकासाची प्रक्रिया पाहिजे तशी वेग धरू शकलेली नाही. १९५७ ते १९८६ पर्यंत अनेक समित्या नेमण्यात येऊन पंचायत राज्यव्यवस्थेचा अभ्यास करण्यात आला. प्रत्येक समितीने आपआपला अहवाल सादर करून पंचायत राज्य संस्थांची पुनर्रचना करून त्यात सुधारणा सुचविल्या त्यासाठी काही शिंफारशी करण्यात आल्यात,परंतु त्यांची योग्य दखल घेतली गेली नाही.

**७३ व्या घटनादुरूस्ती नुसार मात्र खऱ्या अर्थाने या शिफारशींची दखल घेण्यात आली. या दुरूस्तीनुसार :** (१)ग्रामीण भागातील स्त्रियांना राजकारणात उमेदवारी मिळाली. (२) ग्रामीण महिलांना निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत सहभागी होता आले त्यांना निर्णय प्रक्रियेत अधिकार प्राप्त झाला.(३) स्त्रियांच्या वाढत्या सहभागामुळे राजकारणातील स्त्री पुरूष यांच्यातील सत्तेची समीकरणे बदललीत व निर्णय प्रक्रियेतील त्यांचा आत्मविश्वास वाढला. ग्रामीण महिला राजकारणाच्या क्षेत्रात सक्रिय होऊ लागल्या.गावामध्ये सरपंच म्हणून झेंडावंदन करणाऱ्या स्त्रिया ग्रामीण विकास कितपत होतो याकडे प्रत्यक्ष लक्ष देऊन कार्य करणाऱ्या महिलांची संख्या वाढली. स्थानिक समाजीने देखील त्यांच्यावर नेतृत्व करण्याची जबाबदारी त्यांनी योग्य रितीने पार पाडली तर निश्चित पंचायत राज्य व्यवस्था यशस्वी ठरेल यात शंका नाही.

एंकदरीत कालपर्यंत उपेक्षित राहिलेल्या महिलांना ७३ व ७४ व्या घटना दुरूस्ती काद्याने पंचायती राज्य व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निर्वाचनासाठी १/३ आरक्षण मान्य केले आहे. त्यामुळे लोकतांत्रिक व्यवस्थेत महिलांना एक नवीन भूमिका प्रदान झाली आहे. याचा परिणाम असा होईल की, पुढील काळात एक तृतियांश ग्राम पंचायती, क्षेत्रीय पंचायती, जिल्हा परिषदा, नगरपालिका,महानगरपालिका यामध्ये महिला केंद्रबिंदु राहून प्रमूख राहतील.आणि त्यांच्या हातात या क्षेत्राच्या विकासाचे उत्तरदायित्व राहणार आहे.८१ व्या घटना दुरूस्तीनुसार स्त्रिया विविध क्षेत्रात अग्रेसर होऊ लागल्या आहेत. त्यांच्या सामाजिक, राजकीय क्षेत्रातील सहभाग वाढलेला आहे. त्यामुळे राष्ट्रीय विकासात भारतीय महिलांचे योगदान यापुढे महतवाचे ठरणार आहे.

**संदर्भ सूची :**

१) सौ.अलका देशमुख : शासन आणि राजकारण पेज.क्रं. ३१८ प्रथम आवृत्ती १९९७ अंशुल प्रकाशन नागपूर
२) सौ.अलका देशमुख : शासन आणि राजकारण पेज.क्रं. ३१८ प्रथम आवृत्ती १९९७ अंशुल प्रकाशन नागपूर
३) सौ.अलका देशमुख : शासन आणि राजकारण पेज.क्रं. ३१८ प्रथम आवृत्ती १९९७ अंशुल प्रकाशन नागपूर
४) डॉ.शोभा कारेकार आणि डॉ.शरद घोडके : महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण पेज.क्रं.३१० प्रथम आ.२९ ऑ. २००४ अंशुल प्रकाशन नागपूर
५) बी.सी.नरूला : पंचायतीराज व्यवस्था प्रथम आ.अर्जुन पब्लिशिंग हाऊस नई दिल्ली ११०००२
६) Dasarathi Bhuyan: Women in Politic's, First Edition, Arora Publication Delhi. 2008